Mula Education Society's
ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE, SONAI
Tal. Newasa, Dist- Ahmednagar – 414105
YASH GROUP
Ph.: 02427-231384 Email: sonaicollege@yahoo.co.in, mesacsccollege@gmail.com Website:www.acssonaicollege.com
Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune (I.D.PU/AN/ASC/031/1989)
NAAC Re-accredited with 'A' Grade, DBT Star College Scheme, ISO 9001: 2015 Certified, AISHE Code – C-42096



Date: 09/10/2020

# सूचना

कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या अधिकार मंडळांनी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार अंतिम सत्राच्या/ अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमातील (Regular, Backlog & Repeater) विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० पासून करण्यात आले असून या अनुषंगाने सर्व अभ्यासक्रमांची वेळापत्रके विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच online किंवा offline पद्धतीने परीक्षा देण्याचा विकल्प विद्यार्थ्यांकडून घेण्यात आला आहे. तथापि ज्या विद्यार्थ्यांनी कोणताही विकल्प दिला नाही असे सर्व विद्यार्थी online पद्धतीने परीक्षा देऊ शकतात. अशा सर्व विद्यार्थ्यांना यासंबंधीची माहिती त्यांच्या Student Exam Profile मध्ये विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या दिनांक ७ ऑक्टोबर, २०२० रोजी झालेल्या सभेमध्ये मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार जे विद्यार्थी खालील कारणातसव परीक्षा देऊ शकणार नाहीत, त्यांच्यासाठी नजिकच्या कालावधीमध्ये विशेष परीक्षेचे आयोजन करण्यात येईल व याची माहिती वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल.

**१. समकक्ष विषयामुळे अथवा इतर कारणांमुळे एकाच वेळी विद्यापीठाच्या दोन विषयांच्या परीक्षा असल्यास .**

**२. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (CET) / इतर शासकीय स्पर्धा परीक्षा इ. चे आयोजन विद्यापीठ परीक्षेच्या दिवशी असल्यास.**

**३. विद्यार्थ्यास स्वत:ला कोविड-१९ विशनूची बाधा झाली असल्यास.**

**उपरोक्त नमूद कारणासाठी विशेष परीक्षेस बसण्याची परवानगी मिळण्यासाठी विद्यार्थ्याने सर्व आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या प्रती महविद्यालयाच्या प्राचार्य / संचालक (महाविद्यालय परीक्षा अधिकारी) यांच्यामार्फत परीक्षा समन्वय कक्षात सादर करणे आवश्यक आहे. सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.**

09/10/2020
परिक्षा विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सोनई, ता नेवासा जि.अहमदनगर

Principal
Arts, Commerce & Science College,
Sonai, Tal.Newasa, Dist.A'Nagar